# मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग
जा.क्र.मनपा/घ.व्य./५७६/2025-26
दि. ०१ /०८ /2025

## // परिपत्रक //

**विषय :- दि. 02 ऑगस्ट 2025 रोजी स्वच्छ सर्वेक्षण 2024-25 अंतर्गत राष्ट्रीय पुरस्काराच्या निमित्ताने स्वच्छता मिरवणूकीसाठी उपस्थित राहणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहर कार्य मंत्रालय (MoHUA) मार्फत आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण 2024-25 मध्ये 3-10 लाख लोकसंख्या श्रेणीत देशात प्रथम राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. हा पुरस्कार महामहिम मा. राष्ट्रपती, श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते दि. 17 जुलै 2025 रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला आहे.

सदरचा पुरस्कार हा महानगरपालिकेतील विविध विभागांच्या सामूहिक प्रयत्नांचा व समन्वयाचा परिणाम आहे. या अनुषंगाने दि. 02 ऑगस्ट 2025 रोजी स्वच्छता मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. स्वच्छता मिरवणूकीचा प्रारंभ मॅक्सस मॉल, भाईंदर (प.) ते. मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय येथे समाप्त होणार आहे. सदर मिरवणुकीसाठी मोठ्या संख्येने सर्व मनपा. अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

तरी, दि. 02 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता स्वच्छता मिरवणूकीसाठी मॅक्सस मॉल, भाईंदर (प.) येथे सर्व मनपा. अधिकारी व कर्मचारी यांनी न चुकता उपस्थित रहावे.

(डॉ. संभाजी पानपट्टे)
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Nirbhay Patil\Public Health\Raj Documents\Answer of letters\ANTARGAT LETTER.docx

Scanned with OKEN Scanner